**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**<u>प्रेसनोट क्र. ७८ दिनांक २६/१०/२०२३</u>**

# पालघर पोलीस दलाकडून “फिट राईझ ७५ फिटनेस प्रोग्रामचे” आयोजन

सरदार वल्लभभाई पटेल राष्टीय पोलीस अकादमी, हैद्राबाद स्थापनेस ७५ वर्षे पुर्ण होत असल्याने त्यानिमीत्ताने मा. श्री. अमित शहा, गृहमंत्री, भारत सरकार यांचे संकल्पनेतुन संपुर्ण भारतभर “फिट राईज ७५ फिटनेस प्रोग्राम” हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाची सुरवात दिनांक २७/१०/२०२३ रोजी पासुन सुरु होत असुन सुरुवातीस ५ किलोमीटर असे अंतर धावायचे आहे. असे एकुण पुढील ७५ दिवस हा कार्यक्रम संपुर्ण भारतभर चालणार आहे.

त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्ह्यामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यामध्ये देखील सदर फिट राईज ७५ हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पालघर पोलीस दलाचे वतीने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. यादरम्यान ५ किमी दौडचे आयोजन करण्यात आले आहे. फिट राईज ७५ कार्यक्रमाअंतर्गत पालघर जिल्याचे पोलीस अधीक्षक श्री. बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक श्री. पंकज शिरसाट तसेच इतर वरीष्ठ अधिकारी यांचेसह पालघर पोलीस दलातील ५०० पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी नोंदणी करून सहभाग नोंदविला आहे.

याअंतर्गत ५ कि.मी. दौडचे आयोजन करण्यात आले असून सदर दौड ही दि.२७/१०/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता पोलीस अधीक्षक कार्यालय येथून निघणार असून सदर दौडचा मार्ग हा पोलीस अधीक्षक कार्यालय ते जिल्हा परिषद कार्यालय मार्गे ब्रिज वरुन कोळगाव पोलीस मैदानाकडे जाणाऱ्या रोडवरील वळणापर्यंत व परत वळणापासून त्याचमार्गे पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथपर्यंत असा असणार आहे.